रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ६१
www.ramprahar.com
# राम प्रहर
मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग


रायगडात गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजेवर बंदी/२

मोहोपाडा, रिस परिसरात नऊ जणांना श्वानदंश/५

नेरळमधील वकील तरुणाचा डेंग्यूने मृत्यू/७


## ‘लाडकी बहीण योजनेच्या नोंदणीसाठी सप्टेंबरअखेर मुदतवाढ’



**नागपूर :** महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने महत्त्वाची पावले उचलली आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपयांचा लाभ जमा करण्यात येतो. या योजनेच्या नोंदणीसाठी सप्टेंबर अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे यांनी यांनी सोमवारी (दि. १६) सांगितले. नागपूरच्या कोराडी येथील जगदंबा महालक्ष्मी मंदिर परिसरात त्यांच्या हस्ते अगरबत्ती युनिटचे उद्‌घाटन झाले. यानंतर आयोजित मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, महिला सशक्तीकरण मेळाव्यात त्या बोलत होत्या. या मेळाव्यास भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार टेकचंद सावरकर यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी आणि महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. **(संबंधित वृत्त पान २ वर..)**

# शिवसेना नेते आमदार संजय शिरसाट सिडको महामंडळाच्या अध्यक्षपदी

### हेमंत पाटील, आनंदराव अडसूळ यांच्यावरही आता मोठी जबाबदारी



**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांची सिडको महामंडळाच्या अध्यक्षपदी, हिंगोलीचे माजी खासदार हेमंत पाटील यांची बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष म्हणून, तर माजी खासदार आनंदराव अडसूळ यांची राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

गेल्या काही काळापासून राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होणार अशी सातत्याने चर्चा आहे, पण आता विधानसभा निवडणूक जवळ येत असल्यामुळे महामंडळावर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित अर्थात सिडको महामंडळाच्या रिक्त असलेल्या अध्यक्षपदी शिवसेनेचे प्रवक्ते आमदार संजय शिरसाट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

याचबरोबर हिंगोलीचे माजी खासदार हेमंत पाटील यांना वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हरीद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या अध्यक्षपदावर संधी देण्यात आली आहे. सन २०१९ ते २०२४ या काळात पाटील हिंगोलीतून खासदार होते. मागील वेळी हिंगोलीतून बाबुराव कदम यांना तिकीट देण्यात आले होते, तर पाटील यांच्या पत्नी राजश्री पाटील यांना शेजारच्या यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली होती, तर अमरावतीचे आनंदराव अडसूळही याआधी खासदार राहिलेले आहेत. आता लोकसभा निवडणुकीच्या सहा महिन्यांच्या आत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाटील व अडसूळ यांचे राजकीय पुनर्वसन केले आहे.

शिवसेना नेते आमदार संजय शिरसाट तसेच माजी खासदार हेमंत पाटील आणि आनंदराव अडसूळ यांना गणेशोत्सवात बाप्पा पावला आहे.

## कोल्हापूर ते पुणे वंदे भारत ट्रेन सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर ते पुणे या दरम्यान वंदे भारत ट्रेन सुरू झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि. १६) व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. पुणे ते हुबळी या दरम्यानही वंदे भारत ट्रेन सुरू करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाला रेल्वे राज्यमंत्री सोमण्णा यांनी कोल्हापूर स्थानकावर उपस्थिती दर्शविली. त्याचबरोबर देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह खासदार धनंजय महाडिक, खासदार शाहू महाराज आदी उपस्थित होते. शालेय मुले, पत्रकार आणि काही नागरिकांनी या ट्रेनने प्रवास केला. वंदे भारत ट्रेन आता कोल्हापूर ते पुणे या शहरांमध्ये धावणार आहे. लवकरच मुंबईपर्यंत अशी ट्रेन सुरू केली जावी, अशी अपेक्षा कोल्हापूरकरांनी या वेळी व्यक्त केली.

## एक हजार महाविद्यालयांत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र

### शुक्रवारी उद्‌घाटन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्यातील युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टिकोनातून नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात येत आहे. अशा एक हजार केंद्रांचे उद्‌घाटन येत्या शुक्रवारी (दि. २०) सप्टेंबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील १२ महाविद्यालयांमध्ये या केंद्राचा समावेश आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देण्यात आलेले आहे. त्या धोरणाच्या अंमलबजावणीला सकारात्मक वातावरण निर्मिती होण्यासाठी तसेच युवक युवतींना कौशल्य विकासाची संधी महाविद्यालयामध्ये उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नावीन्यपूर्ण योजना सुरू केली आहे. महाविद्यालयात अशी केंद्र स्थापन करून १५ ते ४५ वयोगटातील युवक युवतींना मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी संधी दिली जाणार आहे.








पनवेल : गेल्या ६३ वर्षांची परंपरा असलेल्या मदन कोळी व परिवार यांच्या गणेशोत्सवास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे कोळी परिवाराच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आले.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कान्हाशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर कुटुंबियांच्या न्हावाखाडी येथील गणरायाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. (अधिक छायाचित्रे पान ८ वर..)


## भाजप कोकण संघटन मंत्री सतीश धोंड यांची आमदार महेश बालदींच्या जनसंपर्क कार्यालयास भेट



**उरण : वार्ताहर**

भारतीय जनता पक्षाचे कोकण संघटन मंत्री सतीश धोंड यांनी रविवारी (दि. १५) उरण येथील आमदार महेश बालदी यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट दिली व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, युवा मोर्चा अध्यक्ष निलेश पाटील, भाजप तालुका उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर, मुकुंद गावंड, सरचिटणीस सुनील पाटील, शेखर तांडेल आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मान्यवरांनी कोकण संघटन मंत्री सतीश धोंड यांचे स्वागत केले.



## भारतीय हॉकी संघ अंतिम फेरीत

**बीजिंग :** भारतीय हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. संपूर्ण टूर्नामेंटमध्ये अपराजित राहिलेल्या भारतीय संघाने सेमीफायनलमध्ये दक्षिण कोरियाचा ४-१ने पराभव करत अंतिम फेरीत शानदार प्रवेश केला आहे.

कोरियन संघ भारतासमोर टिकू शकला नाही आणि भारताने हा सामना एकतर्फी जिंकला. आता अंतिम फेरीत भारताचा सामना मंगळवारी (दि. १७) चीनशी होईल. उपांत्य फेरीत चीनने पाकिस्तानचा पराभव केला आहे.

### राम प्रहर
### बुधवारचा अंक नाही

अनंत चतुर्दशीनिमित्त ‘राम प्रहर’च्या कार्यालयास मंगळवारी सुट्टी असल्यामुळे बुधवार (दि. १८)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी व हितचिंतकांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक




# लाडकी बहीण योजनेचा नागपूर पॅटर्न प्रसिद्ध होणार -मंत्री आदिती तटकरे

## महिलांना फुड स्टॉल आणि धनादेशांचे वितरण

**नागपूर : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील जवळपास ३० लाखांचा आर्थिक लाभ नागपूर महिला सन्मान सहकारी पतसंस्थेत जमा करून या योजनेच्या निधीचा योग्य विनियोगाचा आदर्श वस्तूपाठ नागपूर जिल्ह्यातील महिलांनी घालून दिला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात या योजनेसंदर्भातील हा नागपूर पॅटर्न म्हणून प्रसिद्ध होईल, असा विश्वास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोमवारी (दि.१६) येथे व्यक्त केला.



कोराडी येथील जगदंबा महालक्ष्मी मंदिर परिसरात आदिती तटकरे यांच्या हस्ते अगरबत्ती युनिटचे उद्घाटन झाले. यानंतर आयोजित मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, महिला सशक्तीकरण मेळाव्यात त्या बोलत होत्या. आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे आणि टेकचंद सावरकर, महिला व बालविकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, सरपंच नरेंद्र धानोले आदी या वेळी उपस्थित होते.

ना. आदिती तटकरे यांनी कोराडी येथील अगरबत्ती युनिटच्या उत्पादनाची ऑनलाईन विक्री करण्यासाठी यशस्विनी पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन केले. महिला व बालविकास विभागाने नुकतेच या पोर्टलची सुरुवात केली असून राज्यात माविम आणि उमेदच्या माध्यमातून ११ हजार महिला बचत गटांनी आपल्या उत्पादनाची नोंदणी केली आहे, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपयांचा लाभ जमा करण्यात येतो. नागपुरात या योजनेच्या टप्पा २ अंतर्गत ३१ ऑगस्टला ५२ लाख महिलांच्या बँक खात्यात लाभ जमा करण्यात आला आहे. नागपुरातील तीन हजार महिलांनी एकत्र येत नागपूर महिला सन्मान सहकारी पतसंस्थेत १५००पैकी १००० रुपये असे जवळपास ३० लाखांचे भांडवल उभे केले आहे. यातून महिला बचतगटांना गती मिळणार आहे. या योजनेच्या नोंदणीसाठी सप्टेंबर महिन्यात अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

तत्पूर्वी, महिला आर्थिक विकास महामंडळाद्वारे संचालित व जिल्हा नियोजन विभागाच्या नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत अर्थसहाय्यातून १० प्रातिनिधिक फिरत्या फूडस्टॉलचे लोकार्पण झाले. आयसीआयसीआय बँक आणि एचडीएफसी बँकाकडून महिला बचत गटांना देण्यात आलेल्या कर्जाचे धनादेश वितरीत करण्यात आले. आमदार चंद्रशेखर बावनकुळे आणि टेकचंद सावरकर, डॉ. प्रशांत नारनवरे यांनी उपस्थितांना संबोधित केले.

# रायगडात गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे वापरावर बंदी

**अलिबाग : प्रतिनिधी**

दहा दिवसांचा पाहुणचार घेतल्यानंतर मंगळवारी (दि.१७)गणेशोत्सवाची सांगता होणार आहे. या गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान रायगड जिल्ह्यात डॉल्बी साऊंड सिस्टीम, लेझर बीमलाईट आणि स्नो स्प्रे, हीट स्प्रे यांच्या वापरावर जिल्हा प्रशासनाने यांनी निर्बंध घातले आहेत.

याबाबतचे आदेश निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीदरम्यान आवाजाची मर्यादा गणेशभक्तांना सांभाळावी लागणार आहे. अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

उत्सवप्रिय कोकणात उद्या गणेशोत्सवाची सांगता, लाडक्या गणेशाला मंगळवारी वाजत–गाजत निरोप दिला जाणार आहे, मात्र विसर्जन मिरवणुकीदरम्यान डॉल्बी साऊंड सिस्टीम आणि लेझर बीमलाईट, तसेच स्नो स्प्रे यासारख्या साहित्याचा वापर करण्याचा विचार असेल तर तो आवरता घ्या, कारण असे करणे महागात पडू शकते. जिल्हा प्रशासनाने याबाबतची अधिसूनचा जारी केली आहे.

लेझर लाईटमुळे डोळ्यांच्या पटलांना इजा होण्याची शक्यता असते, तर डीजेच्या आवाजामुळे बहिरेपणा आणि हृदयविकाराचे झटके येण्याच्या घटना घडल्या आहेत. यामुळे खबरदारी म्हणून प्रशासनाच्या वतीने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३च्या कलम १६३ (१) अन्वये हा प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ प्रमाणे कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे गणेश विसर्जन करताना आवाजाची मर्यादा पाळा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## पनवेल मनपा आयुक्तांच्या नावाने बनावट व्हॉट्सॲप खाते

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या नावाने सोशल मिडियावर बनावट व्हॉट्सॲप खाते उघडण्यात आले आहे. त्यामुळे सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या खात्यावरून चुकीचे मॅसेज येऊ शकतात, अथवा फसवणूक होऊ शकते. त्यामुळे सर्वांनी सावधगिरी बाळगावी. मॅसेजला रिप्लाय देऊ नये जेणेकरून बनावट खाते चालवणाऱ्या व्यक्तीला त्याचा गैरवापर करता येणार नाही, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

# कामोठ्यात लोखंडी पाईपने वॉचनमची हत्या; आरोपी ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

दोघांमध्ये झालेल्या भांडणातून आरोपीने लोखंडी पाईपने वॉचनमच्या डोक्यात फटका मारून जीवे ठार मारले. यानंतर पसार होण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीस कामोठे पोलिसांनी गजाआड केले आहे.

गुन्हे

कामोठे वसाहतीमध्ये वॉचमन म्हणून काम करणाऱ्या कृष्णकांत पांडे (२९, रा.मिरजापूर) व त्या ठिकाणी सुतारकाम करणाऱ्या छोटुकुमार राय (२९, रा.बिहार) यांच्यात भांडण झाले होते. या भांडणामध्ये छोटू राय याने लोखंडी पाईपने वॉचमन कृष्णकांत पांडे यांच्या डोक्यात फटका मारून त्याला ठार मारले व त्यानंतर तो बिहार येथे जाण्याच्या तयारीत होता. या घटनेची खबर कामोठे पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलीस पथकाला तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे आरोपी छोटुकुमार राय हा लोकमान्य टिळक टर्मिनल्स येथे असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्या ठिकाणी त्याला सापळा रचून ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सपोनि. राकेश पगारे हे करीत आहेत.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी राज्यात सहा लाखांपेक्षा जास्त अर्ज पात्र

**मुंबई : प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे. या योजनेकरिता राज्यात सहा लाख २५ हजार १३९ अर्ज पात्र झाले आहेत.

राज्यात मुंबई विभागात ६३ हजार ९०, नाशिक विभागात एक लाख १२ हजार ७६१, पुणे विभागात ९१ हजार ६२५, अमरावती विभागात एक लाख ३२ हजार ७५८, नागपूर विभागात एक लाख १० हजार ४५५, छत्रपती संभाजीनगर विभागात ४२ हजार ९७६, लातूर विभागात ७१ हजार ४७४ अर्ज पात्र झाले आहेत.

ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच त्यांचे मन:स्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी प्रबोधन व प्रशिक्षणाकरिता या योजनेच्या माध्यमातून तीन हजार रुपये अर्थसहाय्य मिळणार आहे. पात्र ज्येष्ठ लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थता आणि दुर्बलतेनुसार सहाय्यभूत साधने उपकरणे खरेदी करता येतील, त्यामध्ये चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खूर्ची, क्नी–ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर यांचा समावेश असून राज्य शासनाद्वारे नोंदणी करण्यात आलेल्या योगोपचार केंद्र मनस्वास्थ्य केंद्र, मनशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्र येथे त्यांना सहभागी होता येणार आहे.

अधिक माहितीसाठी जिल्ह्यांच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## साळाव चेकपोस्टवर वाहनांची कसून तपासणी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबागहून मुरूड तालुक्याचे प्रवेशद्वार असलेल्या साळाव चेकपोस्टवर रेवदंडा पोलिसांकडून वाहनांची कसून तपासणी करण्यात आली. त्यामुळे चेकपोस्टच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

गणेशोत्सवानिमित्त मुरूडकडे जा–ये करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली आहे. अशातच रेवदंडा पोलिसांनी प्रत्येक वाहनाची कसून तपासणी करण्यात येत होती. पोलीस उपनिरिक्षक नंदगावे यांनी स्वतः प्रत्येक वाहनाची तपासणी केली.

# विस्मरणातील कल्याणकर पुस्तकातून पितरांचे स्मरण

## ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर यांचे प्रतिपादन

**कल्याण : प्रतिनिधी**

आपल्या शहरासाठी आयुष्य वेचलेल्या पितरांचे (शहराच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिलेल्या कल्याणकर व्यक्ती) स्मरण आणि त्यांच्या कार्याची नव्या पिढीला ओळख करून देण्यासाठी स्व. गंगाधरपंत जोशी उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार समितीने विस्मरणातील कल्याणकर पुस्तकाची निर्मिती केली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर यांनी रविवारी (दि.१५) येथे केले.



महाराष्ट्र टाइम्स ठाणे प्लस पुरवणीत ज्येष्ठ पत्रकार शेखर जोशी यांनी लिहिलेल्या विस्मरणातील कल्याणकर या लेखमालिकेच्या पुस्तकाचे प्रकाशन जोगळेकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. हे पुस्तक विनामूल्य वितरित केले जाणार आहे. याच कार्यक्रमात समितीकडून देण्यात येणारा यावर्षीचा उत्कष्ट कार्यकर्ता पुरस्कार रघुनंदन दाबके यांना जोगळेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमास सुभेदार वाडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे संचालक ॲड. सुरेश पटवर्धन, भालचंद्र जोशी, मयुरेश आगलावे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक, विस्मरणातील कल्याणकर पुस्तकाचे लेखक, ज्येष्ठ पत्रकार शेखर जोशी, सार्वजनिक गणेशोत्सव सुभेदार वाडा मंडळाचे या वर्षीचे अध्यक्ष प्रवीण शिंपी, राम जोशी उपस्थित होते. या वेळी शेखर जोशी, सुरेश पटवर्धन, राम जोशी, रघुनंदन दाबके यांनीही मनोगत व्यक्त केले.



**मुंबई : स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या वरळी येथील निवासस्थानी प्रतिष्ठापित गणपतीच्या दर्शनासाठी उपस्थित पत्नी प्रज्ञा मुंडे, कन्या आमदार पंकजा मुंडे, माजी खासदार प्रीतम मुंडे, ॲड. यशश्री, जावई गौरव खाडे, नातवंडे आर्यमान आणि अगस्त्य.**



**उरण : ग्राईइंड नॉर्टन लिमिटेड मोरा कंपनीच्या स्टाफ कॅम्पसमधील कुटुंबांनी उत्साहात गणेशोत्सव साजरा केला.**

# जलतरण स्पर्धेत उरणच्या आर्यन मोडखरकरला तीन पदके

**उरण : वार्ताहर**

फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाचा विद्यार्थी आर्यन मोडखरकर याने आंतरमहाविद्यालयीन जलतरण स्पर्धेमध्ये दोन सुवर्ण व एका रौप्यपदकाची कमाई केली आहे.

प्रगती कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, डोंबिवली येथे १३ व १४ सप्टेंबरदरम्यान मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित आंतरमहाविद्यालयीन जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये आर्यन मोडखरकर याने पुरुष गटात ५० मीटर फ्री स्टाईलमध्ये व ५० मीटर बॅक स्ट्रोकमध्ये सुवर्ण पदक तर ५० मीटर बटरफ्लाय प्रकारात रौप्यपदक मिळवून वीर वाजेकर महाविद्यालयाला चॅम्पियनशिप मिळवून दिली. आर्यनला जिमखाना विभागाचे भूषण ठाकूर, देवेंद्र कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे उपाध्यक्ष पी.जे. पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, सुधीर घरत, भावना घाणेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.जी. पवार, क्रीडा विभागप्रमुख डॉ. विलास महाले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी अभिनंदन केले.

# कर्जतमध्ये मुस्लिम समाजातर्फे रक्तदान शिबिर उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

मुस्लिम समाजातर्फे नबी मुहम्मद पैगंबर साहब यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन सोमवारी (दि.१६) करण्यात आले होते. या वेळी ४२ दात्यांनी रक्तदान केले.


मुस्लिम मस्जिद येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वैभव गणेश जोशी यांनी प्रथम रक्तदान करून रक्तदान शिबिराला सुरुवात केली, तर रशीद मुल्ला यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त रक्तदान केले. या वेळी मनोहर थोरवे, कर्जत मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अमित ओसवाल, उपाध्यक्ष डॉ.मनीष परमार, डॉ.प्रशांत सदावर्ते, प्रकाश शहा, सुरेश



सुर्वे, संजीव ठाकरे, निसार शेख, सैदु शेख, इम्रान मुल्ला, युसुफ खान, एजाज मुल्ला, नवाज तांबोळी, आमिर मणियार, रशिद खान, फैयाज मुल्ला,रमिज बिद्री, फरहान चौगुले, नजीब मुल्ला, हमीद खैराट, रशीद शेख, इस्माईल दिवाण, नदीम खान, गणेश ठोसर, बुरहान शेख, आरिफ उर्फ लाला चौगुले, शकील शेख,अल्कश मुल्ला, कय्युम शेख,मिर्झा शेख, असजद खान, इरफान खलिफा, शकील शेख आदी उपस्थित होते. रक्तसंकलानाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तकेंद्राचे डॉ. एम. ए.शेख, टेक्निशियन सायली राणे, लता देशक, धनश्री लाड व इतर कर्मचाऱ्यांनी केले.


## दुखवटा

### सुरेश वाडेकर



**रेवदंडा** : सुरेश अनाजी वाडेकर यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. गणेशोत्सवाचे दिवशी अचानक तब्येतीत बिघाड झाल्याने त्वरीत मुंबई येथील रुग्णालयात हलविण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचे शनिवारी निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी हरेश्वर मंदिराजवळ २३ सप्टेंबर रोजी होणार असून उत्तरकार्य विधी २६ सप्टेंबर रोजी रेवदंडा निवासस्थानी होणार आहे.

### विजय वैद्य



**मुंबई** : क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात विशेष योगदान दिलेले ज्येष्ठ पत्रकार आणि मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष विजय वैद्य यांचे शनिवारी पहाटे निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. विजय वैद्य यांनी सांस्कृतिक परंपरा असलेला मालवणी महोत्सव आणि वसंत व्याख्यानमाला आदी उपक्रम सुरू केले. वैद्य यांना मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे देण्यात आचार्य अत्रे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच, १९८७ साली मुंबई मराठी पत्रकार संघाचा डॉ. नानासाहेब परुळेकर पुरस्कारही त्यांना प्रदान करण्यात आला होता.


## संपादकीय

# केजरीवालांचे नवे नाटक!

मद्यधोरण गैरव्यवहारप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने जामीन दिल्यानंतर तिहार तुरुंगातून सुटका झालेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी रविवारी दोन दिवसांत मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली व महाराष्ट्रासोबत दिल्लीच्या विधानसभा निवडणुका घेण्याची मागणीही करून टाकली. पक्षकार्यकर्त्यांसमोर अशा धक्कातंत्राचा आधार घेण्याखेरीज त्यांना पर्याय नव्हता हे उघडच आहे. दरम्यान, त्यांच्या सुटकेने हरियाणातील काँग्रेसच्या गोटात मात्र चिंतेचे वातावरण निर्माण झालेले दिसते.

**मद्यघोटाळाप्रकरणी तुरुंगातून जामीनावर सुटका झाल्यानंतर आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनी रविवारी अचानक दोन दिवसांत दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. या धक्कातंत्राचा वापर केजरीवाल यांनी केला असला तरी भारतीय जनता पक्षाने मात्र हे केजरीवाल यांचे नवे नाटक असल्याची टीका केली आहे. भ्रष्टाचारविरोधी आंदोलनावर स्वार होऊन राजकारणात पाय रोवणाऱ्या केजरीवाल यांच्या 'आप'समोर तूर्तास धक्कातंत्राखेरीज पर्याय दिसत नाही. केजरीवाल यांच्यासह पक्षातील अनेक बडी नेतेमंडळी दीर्घकाळ तुरुंगात असल्याने पक्षकार्यकर्त्यांमध्ये आलेली मरगळ दूर करण्यासाठी निवडणुकांची शक्यता सूचित करण्याचा प्रयत्न केजरीवाल यांनी केलेला दिसतो, पण मुख्यमंत्री म्हणून काम करायचे नसेल तर ४८ तासांची मुदत तरी कशासाठी, असा सुयोग्य प्रतिसवाल भाजपकडून केजरीवाल यांना करण्यात आला. यापूर्वी संविधानाच्या रक्षणासाठी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला नाही, असा गंमतीशीर दावाही केजरीवाल यांनी केला. रविवारी 'आप'च्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. राजीनाम्याची घोषणा म्हणजे खरे तर केजरीवाल यांनी एक प्रकारे आपल्या गुन्ह्याची कबुली देण्यासारखेच आहे असा पलटवारही भाजपकडून करण्यात आला. केजरीवाल यांनी कार्यकर्त्यांसमोर बोलताना स्वत:ची तुलना अग्निपरीक्षा द्याव्या लागलेल्या सीतामातेपासून भगतसिंहापर्यंत करून स्वत:ची भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे मलीन झालेली प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्नही केला. मला अग्निपरीक्षा द्यायची आहे. निवडणुकीत जनतेने प्रामाणिकपणाचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपण मुख्यमंत्रीपदावर विराजमान होऊ असे केजरीवाल म्हणाले. प्रत्यक्षात सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांना जामीन मंजूर करताना दिल्लीच्या सचिवालयात जाण्यास मज्जाव केला असून नायब राज्यपालांच्या परवानगीविना कोणत्याही फायलीवर स्वाक्षरी करण्यास मनाई केली आहे हे लक्षात घेतले पाहिजे. याआधी लोकसभा निवडणुकीतील प्रचारासाठी केजरीवाल यांना हंगामी जामीन मंजूर झाला होता, मात्र जामिनाची मुदत संपताच त्यांना अटक झाली होती. आता पुन्हा जामीन मिळाल्याने जम्मू-काश्मीर तसेच हरियाणातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात त्यांना सहभागी होता येईल. दरम्यान, केजरीवाल यांनी राजीनामा दिल्यास, दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी कोण याची चर्चा सुरू झाली आहे. आपमध्ये दोन गट पडले असून ही गटबाजी केजरीवालांना हाताळता येत नसल्यानेच त्यांनी राजीनाम्याची घोषणा व निवडणुकीची मागणी केल्याचे सांगितले जाते. दिल्ली विधानसभेची मुदत फेब्रुवारीमध्ये संपणार आहे. तरीही आताच विधानसभा भंग करून नोव्हेंबरमध्ये महाराष्ट्रासह दिल्लीचीही विधानसभा निवडणूक घेतली जावी अशी मागणी केजरीवाल यांनी केली. यामुळे दिल्लीमधील आपच्या कार्यकर्त्यांना निवडणुकांचे वेध लागतील, पण तूर्तास निवडणुका तोंडावर असलेल्या हरियाणातील काँग्रेस पक्षाच्या गोटात मात्र केजरीवाल यांच्या सुटकेने नक्कीच चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या निवडणुकीत 'आप' व काँग्रेस वेगवेगळे लढत आहेत. हरियाणाच्या शहरी भागांत केजरीवाल यांनी प्रचारात सहभाग घेतल्यास 'आप'मुळे काँग्रेसला फटका बसू शकेल हे जाणणाऱ्या इंडिया आघाडीच्या नेत्यांनी त्यामुळे केजरीवाल यांच्या सुटकेबद्दल उलटी ओरडही सुरू केली आहे याला काय म्हणावे?**

# देशाचे पंतप्रधान, विकासपुरुष नरेंद्र मोदी



नरेंद्र दामोदरदास मोदी हे भारतीय जनता पक्षाचे नेते आणि २६ मे २०१४पासून भारताचे पंतप्रधान आहेत. ते याआधी गुजरात राज्याचे मुख्यमंत्री होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जन्मलेले ते भारताचे पहिले पंतप्रधान आहेत.

पंतप्रधान मोदी यांच्या वडिलांचे नाव दामोदरदास मूलचंद मोदी, तर आईचे नाव हिराबेन. या दोघांच्या सहा अपत्यांपैकी नरेंद्र तिसरे अपत्य. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक राहिलेले आहेत.

नरेंद्र मोदींनी २६ मे २०१४ रोजी सर्वप्रथम पंतप्रधानपदाची शपथ घेतली. या पदावर पोहचणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते पहिले प्रचारक, तर दुसरे स्वयंसेवक होत. ते भारताचे अतिशय प्रभावी पंतप्रधान आहेत. जनतेशी थेट संवाद करणारे पहिलेच पंतप्रधान आहेत. भारतात अमूलाग्र बदल करण्याचे स्वप्न ते योग्य ते योगदान देऊन सार्थ करत आहेत.

पंतप्रधान मोदींनी किशोरवयात आपल्या भावासमवेत चहाचे दुकान चालविले. तरुणपणी महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच ते संघाचे पूर्ण वेळ प्रचारक बनले. १९९१मध्ये कन्याकुमारी-श्रीनगर एकता यात्रेपासून त्यांचा राजकारणात उदय झाला. १९९५मध्ये भाजपचे राष्ट्रीय सचिव म्हणून त्यांनी पाच राज्यांची जबाबदारी निभावली. २००१ ते २००२ व नंतर २००२ ते २००७ तसेच २००७ ते २०१२ या काळात गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी समर्थपणे धुरा वाहिली. भाजपतर्फे त्यांची सप्टेंबर २०१३मध्ये पंतप्रधानपदाचे भावी उमेदवार म्हणून घोषणा झाली.

भारतीय जनता पक्षाचे नेते नरेंद्र मोदी यांच्यासारखा साधी चहाची टपरी चालवणारा महत्त्वाकांक्षी तरुण पंतप्रधानपदाचा प्रमुख उमेदवार बनेपर्यंत मजल गाठू शकला. गुजरातमध्ये प्रचारक म्हणून संघटकाचे काम करताना त्यांनी राज्यात आपली घट्ट पकड निर्माण केली. २००१मध्ये भाजपचे केशुभाई पटेल पायउतार झाल्यानंतर मुख्यमंत्रिपदी पहिल्यांदाच एका प्रचारकाची वर्णी लागली. संघटक एक उत्तम प्रशासक बनू शकतो, हे त्यांनी सिद्ध केले. मोदींनी सलग तीनदा सत्ता पटकावली.

शंकरसिंह वाघेला व मोदी यांनी राज्यात भाजपला सत्तेत आणण्याचे कडवे आव्हान स्वीकारत १९९५मध्ये दोन-तृतीयांश बहुमताने पक्षाची सत्ता प्रस्थापित केली. शालेय जीवनापासून संघाच्या कार्यास वाहून घेतलेल्या मोदींनी अडवाणींच्या सोमनाथ व अयोध्या रथयात्रा आयोजनात मोठी भूमिका निभावली होती. राज्याची सत्ता राखतानाच राष्ट्रीय राजकारणात सतत चर्चेमध्ये राहण्याचे कसब त्यांच्याकडे होते. भाजपचे पंतप्रधानपदाचे प्रमुख उमेदवार म्हणून अघोषित उमेदवारी ठसवण्यातही ते यशस्वी झाले. ते प्रचंड बहुमताने निवडून आले आणि भारताचे पंतप्रधान बनले.

नरेंद्र मोदी ऊर्फ 'नमो'यांच्यावर सतत वृत्तपत्रांमधून आणि अन्य नियतकालिकांतून लिखाण प्रसिद्ध होत असते. त्यांच्या जीवनावर काही पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा! (साभार : इंटरनेट)

# महंमद पैगंबरांचा जन्मदिवस : ईद-ए-मिलाद

*महम्मद याच नावाने,*
*भरावी जिंदगी माझी ।*
*महम्मद नाम घेताना,*
*सरावी जिंदगी माझी ।।*
*महम्मद नाव आशेचे,*
*दिलाशाचे, प्रकाशाचे ।*
*कृपाछत्रात तेजाच्या,*
*भिजावी जिंदगी माझी ।।*
*तुझ्या नामातली गोडी,*
*जनांच्या जीवनी यावी ।*
*तुझ्या तेजात उजळावी,*
*प्रवाही जिंदगी माझी ।।*
*मना आधार प्रेमाचा,*
*मना आधार श्रद्धेचा ।*
*जगा संदेश देताना,*
*झरावी जिंदगी माझी ।।*
*जगाला एकता, समता,*
*दिली ज्या थोर पुरुषाने ।*
*तयाच्या शिकवणीने,*
*सावरावी जिंदगी माझी ।।*

ईद-ए-मिलाद म्हणजेच महंमद पैगंबरांचा जन्मदिवस. हा सण संपूर्ण जगभरात अतिशय श्रद्धेने साजरा केला जातो. अल्लाहच्या संदेशाचे व्यावहारिक प्रतिबिंब, तमाम दुनियेतील माणसांपुढे, पैगंबरांच्या चरित्रातून उभे केले आहे. त्यांनी माणसाला अंधकारातून प्रकाशाकडे आणण्याचे कार्य केले तसेच मानवालाअल्लाहच्या उपासनेकडे वळवण्याचे मार्गदर्शन केले.

महंमद पैगंबरांचा जन्म इसवी सन २० एप्रिल ५७१ रोजी मक्का या शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अब्दुल्लाह आणि आईचे नाव आमना. त्यांच्या जन्मापूर्वीच वडिलांचे आणि ते सहा वर्षांचे असताना त्यांच्या आईचेही निधन झाले. त्यानंतर त्यांचे आजोबा अब्दुल मुत्तलिब यांनी त्यांचे संगोपन केले. ते सतत आजोबांबरोबर असत, मात्र ते आठ वर्षांचे असताना आजोबांचेही निधन झाले. त्यानंतर काका अबू तालिब यांनी त्यांची जबाबदारी घेतली आणि त्यांचे पालनपोषण केले.

लहानपणी ते बकऱ्या चारत असत आणि गरिबांना तसेच अडीअडचणीत असलेल्या लोकांना मदत करत. त्यांचे हृदय हे दया आणि माणुसकीने ओतप्रोत भरलेले असे होते. पैगंबरांचे व्यक्तिमत्त्व, अत्यंत चारित्र्यसंपन्न होते. ते सुंदर होते तसेच त्यांचे बोलणे स्पष्ट व गोड होते. वयाच्या चाळिशीमध्ये पैगंबरांना एकांताची आवड निर्माण झाली. ते मक्काच्या बाहेर असलेल्या 'हिरा' नावाच्या पर्वतीय गुहेत शांततेत ध्यानधारणा करत असत. अल्लाहने आपले संदेश, देवदूत जिब्रील यांच्या माध्यमातून हजरत पैगंबरांना पाठवायला सुरुवात केली. पुढील २३ वर्षे त्यांना हे संदेश प्राप्त होत राहिले आणि त्यांनी त्या संदेशांची जगाला शिकवण दिली. समाजापर्यंत या संदेशांचा प्रसार करताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला आणि काहीवेळा युद्धाचे प्रसंगही निर्माण झाले. या संदेशांचा संग्रह करून 'कुरआन' हा पवित्र दिव्यग्रंथ तयार झाला आणि हाच इस्लाम धर्म होय.

इस्लाम धर्माने मानवजातीला शांती आणि सद्गुणांनी भरलेला जीवनाचा मार्ग दिला आहे. त्यामुळे माणसाला जगण्याची योग्य दिशा मिळाली. पैगंबर स्वतः न्यायप्रिय, निस्वार्थी व इमानदार होते. माणुसकी असलेले सहृदयी व्यक्ती होते. मित्रच काय, पण शत्रूही त्यांचे गुणगान गात. त्यांच्या या प्रामाणिकपणामुळे समाजाकडून त्यांना विश्वासू अशी उपाधी मिळाली होती म्हणजेच 'अल अमीन'!

हजरत महंम्मद पैगंबरांची जयंती आज आपण साजरी करत आहोत. त्यांनी एकेश्वराचा प्रचार व प्रसार केला. अल्लाह एक आहे, तो निराकार आहे आणि आपणा सर्वांना शेवटी परतून त्याच्याकडेच जायचे आहे, तेव्हा आपापल्या जीवनाची काळजी घ्या. सत्कर्मे करीत राहा. दानधर्म करा. भुकेल्याला जेवण द्या. तहानलेल्या पाणी द्या. मुलाबाळांची उपेक्षा करू नका. मुलगा असो व मुलगी त्यांचे संगोपन प्रेमाने करा सांगून स्त्री-भ्रूणहत्येला त्यांनी कडाडून विरोध केला व स्त्रीजातीचा सन्मान वाढवला.

समस्त मानवजात एक आहे. आपण सर्वजण त्या एकमेव विधात्याची लेकरे आहोत असे सांगत सर्व भेदभावांना त्यांनी मूठमाती दिली. त्या एकमेव अल्लाहसमोर सर्व समस्त मानवजात एक आहे. सर्व समसमान आहेत. नम्रता, दयाळूपणा, सहनशीलता, स्वसुख निरपेक्षता, औदार्य प्रत्येकाच्या मनात रुजवा. मुलांनी आई-वडिलांना, थोरामोठ्यांना मान द्यावा. मानवाची सेवा हीच अल्लाहची सेवा, असे ते मानत.

पहाटे उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंचा काळ ईशसेवा करा. त्याचे स्मरण करा. त्याची स्तुती करा. जेवायला बसताना त्याचे नाव घेऊन सुरुवात करा. तसेच आपण जेवण्याआधी शेजारच्या घरातील माणसे जेवली आहेत का ते पहा आणि मगच जेवा, अशी त्यांची तत्वे होती.

इस्लाम धर्म हा इमान, नमाज, रोजा/उपवास, जकात-धर्मकर, हज यात्रा हा पाच स्तंभावर-तत्वांवर उभा आहे. त्यांचा स्वीकार म्हणजेच इस्लामचा प्रचार आणि प्रसार होय. हजरत महंम्मद पैगंबरांनी या पाच तत्त्वांचे पालन, आपल्या संपूर्ण आयुष्यात केले. अवघ्या ६३ वर्षांच्या जीवनकाळात, त्यांनी इस्लाम धर्माचा संदेश जगभर पसरवला. त्यांच्या शिकवणीने आणि आचरणाने इस्लाम धर्माला जगभर मान्यता मिळाली. अशा या महामानवाला मनापासून प्रणाम करून, अदबीने सलाम करून मी माझ्या वाणीला रजा देतो.

**-डॉ. समीर शेख, पनवेल**



## बदलते तंत्रज्ञान

# सिमकार्डवर सरकारची कारवाई, कोट्यवधी मोबाईल कनेक्शन बंद



फ्रॉड रोखण्यासाठी सरकारकडून नवनवीन पावले उचलली जात आहेत. आता फ्रॉड मोबाईल कनेक्शनवर कडक कारवाई करण्यात आली आहे. संचार साथीच्या मदतीनं फ्रॉड नंबर ओळखून ते बंद करण्यात आल्याची माहिती दूरसंचार मंत्रालयाने दिली आहे. दूरसंचार सेवा सुधारण्यासाठी ट्राय आणि दूरसंचार विभागाने हा निर्णय घेतला आहे.

एक निवेदन देताना मंत्रालयाने नेटवर्क अव्हेलेबिलिटी, कॉल ड्रॉप रेट्स आणि पॅकेट ड्रॉप रेट्सला हायलाइट केले आहेत. ते सुधारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचेही सांगण्यात आले. आतापर्यंत एक कोटींहून अधिक मोबाईल कनेक्शन बंद करण्यात आले आहेत. स्पॅम कॉल्स थांबवण्यासाठी 'ट्राय'ने टेलिकॉम ऑपरेटर्सना कनेक्शन बंद करण्यास आणि ब्लॅकलिस्टिंग करण्यास सांगितले होते. यामध्ये रोबो कॉल्स आणि प्री-रेकॉर्डेड कॉल्सचाही समावेश होता.


दरम्यान, अलिकडच्या काळात जवळपास साडेतीन लाख नंबर्स बंद झाले आहेत. यामध्ये ५० संस्थांना ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यात आले आहे. सुमारे ३.५ लाख अनव्हेरिफाइड एसएमएस हेडर आणि १२ लाख कंटेंट टेम्प्लेट्सला ब्लॉक कण्यात आले आहे. याशिवाय, १२ लाख कंटेंट टेम्प्लेट्सही ब्लॉक करण्यात आले आहेत.

संचार साथीच्या मदतीने जवळपास २.२७ लाख मोबाईल हँडसेट ब्लॉक करण्यात आले होते. या सर्वांचा सायबर गुन्ह्यात आणि आर्थिक फसवणुकीत सहभाग होता. दरम्यान, नेटवर्क सुधारण्यासाठी दूरसंचार मंत्रालयाकडूनही सातत्याने काम केले जात आहे. ट्रायनेही नियमात सुधारणा केली आहे, मात्र त्यानंतरही नेटवर्कमध्ये ओळख पटवली जात आहे. हे नियम १ ऑक्टोबर २०२४पासून लागू करण्यात आले होते.

**तुम्ही काय करू नका?**

तुमचा वैयक्तिक मोबाईल नंबर इतर गोष्टींसाठी वापरू नका. यामध्ये प्रमोशनल कॉल्सचाही समावेश आहे. आपण ते वापरू नये. असे केल्याने तुम्ही टेलिकॉम कंपन्यांच्या हिटलिस्टमध्येही येऊ शकता आणि तुमचा नंबर ब्लॉकही होऊ शकतो.

# आशयघन काव्याचे जनक वसंत बापट



**निमित्त**

बापट वसंत हे सुप्रसिद्ध मराठी कवी, वक्ते, कलावंत होते. त्यांचा आज स्मृतीदिन आहे. बापट यांचा जन्म २५ जुलै १९२२ रोजी सातारा जिल्ह्यातील कराड याठिकाणी झाला. पुण्याच्या स.प. महाविद्यालयातून एमए (१९४८). त्यानंतर मुंबईतील 'नॅशनल कॉलेज' आणि 'रामनारायण रुईया कॉलेज' या महाविद्यालयांतून मराठी आणि संस्कृत विषयांचे प्राध्यापक होते. १९७४पासून मुंबई विद्यापीठातील गुरुदेव टागोर अध्यासनाचे प्राध्यापक होते. साहित्य अकादमीचे ते सदस्य होते.

लहानपणापासून बापटांवर राष्ट्र सेवा दलाचे आणि साने गुरुजींच्या सहवासाचे संस्कार झाले. बिजली (१९५२) या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहावर या संस्कारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. 'सेतु' (१९५७), 'अकरावी दिशा' (१९६२), 'सकीना' (१९७२) आणि 'मानसी' (१९७७) हे त्यांचे बिजलीनंतरचे काव्यसंग्रह. बिजली ते मानसीपर्यंत त्यांच्या कवितेचा झालेला प्रवास कवी म्हणून झालेल्या त्यांच्या विकासाचा द्योतक आहे. बिजलीनंतरच्या काव्यसंग्रहांतून त्यांच्या अनुभवांचे क्षेत्रही उत्तरोत्तर अधिकाधिक विस्तारत गेल्याचे दिसते. संस्कृत आणि इंग्रजी कवितेचा प्रभावही या कवितेवर दिसून येतो. सामाजिक विषमता आणि अन्याय यांच्या तीव्र जाणिवेबरोबरच यौवनाचा अभिजात डौल, निसर्गाच्या विभ्रम-विलासांतून खट्याळ शृंगार व्यक्तविण्याची प्रवृत्ती, लावणीसारख्या जुन्या काव्यप्रकाराचे पुनरुज्जीवन करण्याचा रसिक प्रयत्न यांचा प्रत्यय त्यांच्या बिजलीनंतरच्या कवितेत येतो. त्यांच्या कवितेचे परिपक्व रूप मानसीमध्ये विशेषत्वाने जाणवते. या काव्यसंग्रहातील त्यांची कविता मितभाषी, परंतु आशयदृष्ट्या अधिक गहन अशी आहे.

संस्कृतातील अभिजातता आणि नादवती शब्दकळा बंगालीतील-विशेषत: गुरुदेव टागोरांच्या कवितेतील-मानवतावाद आणि इंग्रजी कवितेतील स्वच्छंदतावादी प्रवृत्ती यांचे ठळक संस्कार बापटांच्या कवितेवर झालेले दिसतात. बापटांची अस्सल रसिकता आणि अतिंद्रिय अनुभवांना रूपरसगंधाचे लावण्य प्राप्त करून देणारी त्यांची बहुरंगी प्रतिमासृष्टी हेही त्यांच्या कवितेचे विशेष लक्षणीय पैलू होत.'बारा गावचे पाणी' (१९६७) हा बापटांचा प्रवासवर्णनपर ग्रंथ आहे. या ग्रंथात भारताचा निसर्ग, चालीरीती, लोककला, यांचे प्रत्ययकारी चित्रण त्यांनी केले आहे. अशा या श्रेष्ठ कवीचे १७ सप्टेंबर २००२ रोजी निधन झाले.

वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा करंदीकर यांच्या संयुक्त काव्यदर्शनाचे अर्ध शतकाहून अधिक काळ देशभरात कार्यक्रम झाले. १९६९मध्ये त्यांनी युगोस्लोव्हियातील आंतरराष्ट्रीय कविसंमेलनात भारताचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला. १९७७ आणि १९९३मध्ये आखाती देशात त्यांच्या काव्यदर्शनाचे कार्यक्रम झाले. सामाजिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक विषयांवर महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर त्यांची व्याख्याने झाली. साहित्य अकादमीच्या कार्यकारिणीवर ते १० वर्षे होते. याशिवाय इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मास कम्युनिकेशन्स दिल्ली या संस्थेचे ते अनेक वर्षे सदस्य होते.

'चंगामंगा', 'अबडक तबडक', 'आम्ही', 'गरगर गिरकी', 'फिरकी', 'फुलराणीच्या कविता', 'परीच्या राज्यात' या त्यांनी लिहीलेल्या बालकविता. सेतु या काव्यसंग्रहास व लहान मुलांसाठी त्यांनी लिहिलेल्या बाल-गोविंद (१९६५) ह्या नाटकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार लाभला. साहित्याभ्यास (१९८१) हा त्यांचा अगदी अलिकडील ग्रंथ. संगीत, अभिनय, लोककला. यांची उत्तम जाण बापटांच्या ठायी आहे. राष्ट्रसेवा दलातर्फे त्यांनी सादर केलेल्या 'महाराष्ट्र दर्शन', 'भारत दर्शन' यांसारख्या यशस्वी कार्यक्रमातून तिचा प्रत्यय येतो. (साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!** **(छाया : सुधीर नाझरे)**



**मुरूड : दमदार पावसामुळे भातशेती बहरली असून परिसर निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. गोयगान गावचे सुंदर छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# गर्भवती महिलांनी घ्यावी सांध्यांची विशेष काळजी

गर्भधारणेदरम्यान सांध्यांच्या समस्या दूर ठेवण्यासाठी गर्भवती महिलांनी विशेष खबरदारी घेणे गरजेचे आहे. गर्भधारणेत सांध्यांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते आणि स्त्रियांना भविष्यात सांधेदुखीसारख्या समस्येला सामोरे जावे लागते. या संदर्भात डॉ. अलोक पांडे यांनी टिप्स देत मार्गदर्शन केले आहे.



**कंबरदुखी :** बाळाच्या जन्मादरम्यान शरीर मोठ्या प्रमाणात रिलॅक्सिन हार्मोन्स तयार करते, जे प्रसुतीसाठी तुमच्या पेल्विक क्षेत्रातील अस्थिबंधन मऊ होण्यास मदत करतात. परिणामी तुमच्या नितंबांच्या भागात वेदना आणि अस्वस्थता जाणवू शकते. या वेदना दैनंदिन कामात व्यत्यय आणतात. यासाठी योग्य ती काळजी घेणे अत्यावश्यक आहे.

**पाठीच्या खालच्या भागातील वेदना :** पाठीच्या खालच्या भागात दुखू शकते, जे कधीकधी खूप त्रासदायक ठरू शकते. सततच्या वेदनांमुळे कामावर लक्ष केंद्रित होत नाही आणि चिडचिडही होते.

**पाय सुजणे :** शरीराच्या ऊतींमध्ये द्रव तयार झाल्यामुळे पायांना सूज येते. त्यामुळे महिलांसाठी चालतानाही अडचणींचा सामना करावा लागतो.

**कार्पल टनल सिंड्रोम :** हे बहुतेक वेळा तिसऱ्या तिमाहीत येते आणि त्यामुळे बोटे आणि हातामध्ये बधिरपणा, वेदना आणि मुंग्या येणे यासारखी लक्षणे दिसतात.

गरोदर महिलांनी कमी, हलके व्यायाम करावा. डॉक्टरांचा सल्ला घेऊन तसेच फिटनेस ट्रेनरच्या मार्गदर्शनाखाली व्यायाम करावा. चालणे हा एक उत्तम व्यायाम पर्याय ठरू शकतो. सलग काम करू नका. थोड्या-थोड्या अंतराने ब्रेक घ्या आणि पुरेशी विश्रांती घ्या. बसून झोपणे टाळा. नितंबांच्या आणि पाठीवरच्या स्नायूंवरील दबाव कमी करण्यासाठी खाली वाकताना, बसताना, काम करताना, एखादी वस्तू उचलताना विशेष काळजी घ्या.

हाडांच्या मजबुतीसाठी तज्ज्ञांनी सांगितल्यानुसार कॅल्शियम सप्लिमेंट घ्या. शिवाय तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली वजन उचलण्याचे व्यायाम किंवा हलके स्ट्रेचिंग केल्याने हाडांची घनता वाढण्यास मदत होऊ शकते. शरीर हायड्रेटेड राखणे आणि पुरेसे पाणी पिणे हे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास आणि सूज कमी करण्यास मदत करते. औषधे चुकवू नयेत. गर्भवती महिलांनी त्यांच्या आणि बाळाच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी.

# मुलीनेच पैसे देऊन केली आईची हत्या

## मुलीसह दोन आरोपी गजाआड; २३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी

**पनवेल : वार्ताहर**

स्वतःच्या जन्मदात्या आईला ठार मारण्याचा कट मुलीनेच रचला व त्यात ती यशस्वी झाली, परंतु पनवेल शहर पोलिसांच्या सखोल तपासामध्ये अखेर हे निष्पन्न झाले व त्यांनी मुलीसह प्रत्यक्ष खून करणाऱ्या दोघांना गजाआड केले आहे. या आरोपींना न्यायालयाने २३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

प्रिया नाईक असे मृत आईचे नाव असून या प्रकरणी मुलगी प्रणाली नाईक, विवेक पाटील व विशाल पांडे या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. बाहेर फिरण्यास तसेच मोबाईल वापरास आईकडून निर्बंध घातले जात असल्याच्या रागातून मुलीने हे पाऊल उचलल्याने तपासात समोर आले आहे. प्रणाली ही विवाहित असून तिला पाच वर्षांची मुलगी आहे. पतीसोबत न पटल्याने ती दोन वर्षांपासून माहेरी राहण्यास आली आहे.



या दरम्यान प्रिया यांनी प्रणालीवर बंधने घातली होती. ती बाहेर गेल्यास तिला सतत फोन करणे, मोबाईलची तपासणी करीत होती. आईच्या या निर्बंधांना ती वैतागली होती.

या प्रकरणातील आरोपी विवेक पाटील हा प्रणालीला बहीण मानत होता. विवेकला पैशांची गरज असल्याने त्याने तिच्याकडे पैशांची मागणी केली होती. प्रणितालाही आईच्या निर्बंधातून सुटका हवी असल्याने तिने विवेकला १० लाख रुपये देण्याची तयारी दर्शविली, मात्र त्या बदल्यात आईची हत्या करण्यास सांगितले.

पैशाची गरज असल्याने विवेकने ही ऑफर स्वीकारली. त्याचा मित्र विशाल पांडे याच्या मदतीने विवेकने शुक्रवारी (दि.१३) सायंकाळी प्रिया या घरात एकट्याच असताना वायरने गळा आवळून त्यांची हत्या केली. रात्री प्रिया यांचे पती प्रल्हाद नाईक हे घरी आले असता प्रिया बेशुद्धावस्थेत आढळल्या. त्यांनी तातडीने प्रिया यांना रुग्णालयात दाखल केले, पण डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याबाबत पनवेल शहर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. शवविच्छेदन अहवालात प्रिया यांची गळा आवळून हत्या झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार पोलीस पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे शोध सुरू केला असता विवेक आणि विशाल यांनी प्रिया यांची हत्या केल्याचे उघड झाले.

दोघांची चौकशी केली असता प्रणालीने दिलेल्या सुपारीनुसार प्रिया यांची हत्या केल्याचे कबूल केले. त्यानंतर पोलिसांनी प्रणितालाही अटक केली. या आरोपींना पनवेल न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपींची २३ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# मोहोपाडा, रिस परिसरात पिसाळलेल्या श्वानांची दहशत; नऊ जण जखमी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा, रिस परिसरात पिसाळलेल्या श्वानांनी दहशत निर्माण केली आहे. या श्वानांनी परिसरात रस्त्यावरून जात असताना नऊ जणांच्या अंगावर धावून जखमी केल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे.

मागील आठवड्यात मोहोपाडा परिसरात श्वानांच्या हल्ल्यात तिघेजण जखमी झाल्याची घटना घडली होती. रविवारी सायंकाळी उशिरा रिस गावात पिसाळलेल्या श्वानाने तब्बल नऊ जणांना जखमी केले. ही घटना वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत सरपंच उमा मुंढे, माजी सरपंच संदीप मुंढे, उपसरपंच भूषण





पारंगे यांना समजताच त्यांनी तत्काळ रिस गावात धाव घेतली. गावातील शंकर पारंगे, अभिजित घरत, प्रतिक आडाने, दिनेश चव्हाण, राकेश पारंगे यांनी पिसाळलेल्या श्वानाचा शोध सुरू करून पकडण्याचा प्रयत्न केला. उपसरपंच भूषण पारंगे यांच्या अंगावर पिसाळलेला कुत्रा धावून आला.

परिसरात भटक्या श्वानांचा मोठ्या प्रमाणात वावर दिसून येत आहे. रात्रीच्या वेळी हे श्वान मोठमोठ्याने भुंकत येणाऱ्या-जाणाऱ्या दुचाकीस्वारांचाही पाठलाग करतात. या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.



**खोपोली : भाजपचे शहराध्यक्ष रमेश रेटरेकर यांच्या निवासस्थानी श्री गणरायाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहर चिटणीस विनायक माडपे यांनी दर्शन घेतले.**



**जयदीप मित्र मंडळ, नेरळ**



**पंकज पाटील, केगाव दांडा, उरण**



**सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, सेक्टर ४४, नेरूळ सीवूड्स**



**राजेश भोईर, मोठी जुई, उरण**



**गणेश पाटील, दिघाटी, पनवेल**



**रोहा : भाजप युवा मोर्चा सरचिटणीस मिलिंद झुरे यांच्या निवासस्थानी रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी संकेत सर्लेकर, रवी भायतांडेल, यश पाटील, सावेश झुरे, अनिरुद्ध झुरे, यशवंत भोईर उपस्थित होते.**



**खालापूर : माजगाव येथील माजी सरपंच गोपीनाथ जाधव यांच्या घरी विराजमान झालेल्या गणपती बाप्पाचे खालापूर शहराध्यक्ष दीपक जगताप यांनी दर्शन घेतले.**

# पार्थ फाउंडेशनतर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सव मंडळांचा सन्मान

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

पर्यावरणाचे, निसर्गाचे संवर्धन व्हावे या अनुषंगाने तसेच पर्यावरणविषयक जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून पार्थ फाउंडेशनतर्फे विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सार्वजनिक पर्यावरणपूरक गणेशोत्सव मंडळ म्हणून सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

राजे शिवाजी मित्र मंडळ बुरुड आळी कोटनाका, जय शिवराय युवक मंडळ कामठा, गणेशोत्सव सार्वजनिक देऊळवाडी, युवक मंडळ देऊळवाडी, श्री गणेशोत्सव मंडळ उरण, स्वामी विवेकानंद चौक, शिवसेना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ गणपती चौक उरण या सार्वजनिक



मंडळांना पार्थ फाउंडेशनतर्फे गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह राष्ट्रवादी काँग्रेसचे उरण तालुकाध्यक्ष परीक्षित ठाकूर व इतर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते देण्यात आले.

या वेळी उरण तालुका युवाध्यक्ष समत भोंगले, सरचिटणीस दिनेश पाटील, युवक काँग्रेस उपाध्यक्ष अमित साहू, नागाव पंचायत विभाग अध्यक्ष संदेश म्हात्रे, घारापुरी अध्यक्ष त्रिकाळ पाटील, स्वप्नील कुंभार, दीपराज ठाकूर, भूषण ठाकूर आदी उपस्थित होते.



# सीकेटी महाविद्यालयात जिल्हास्तरीय प्रजासत्ताक संचालनपूर्व निवड चाचणी यशस्वी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज स्वायत्तच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून रायगड जिल्हास्तरीय प्रजासत्ताक संचालनपूर्व निवड चाचणी रविवारी (दि.१५) यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली.

निवडीसाठी रायगड जिल्ह्याच्या वेगवेगळ्या महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक, जिल्हा समन्वयक प्रा. तुलसीदास मोकल व कार्यक्रमाधिकारी व विभागीय समन्वयक डॉ. प्रवीण गायकवाड उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सूर्यकांत परकाळे यांनी, महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या विद्यार्थी केंद्रित कार्यक्रमाचा उल्लेख केला.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सेक्रेटरी डॉ. सिद्धेश्वर गडदे यांच्याकडून अविरतपणे मिळणाऱ्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

रायगड जिल्हा समन्वयक प्रो. मोकल यांनी, मुंबई विद्यापीठ व सीकेटी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी घेतलेल्या पुढाकाराचे कौतुक केले. स्वयंसेवकांना निवड चाचणी विषयीच्या नियमावली समजून सांगितली. कार्यक्रमाधिकारी प्रा. पूजा दांदले यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी जानवी हातमोडे व साशा वैंगांकर हिने केले.

निवड चाचणीच्या वेळी संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रो डॉ. एस. के. पाटील, आयक्यूसी समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विनोद नाईक यांनी भेट देऊन सहभागी स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या.

एनसीसी विभागाचे इन्चार्ज कॅप्टन डॉ. उद्धव भंडारे, जिमखाना विभागाच्या प्रा. प्रतिज्ञा भोईर तसेच राष्ट्रीय सेवा योजनचे स्वयंसेवक व एनसीसीचे कॅडेट्स यांनी चाचणी प्रक्रियेत मोलाची भूमिका पार पाडली. शेवटी सर्व उपस्थित स्वयंसेवकांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.




**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिन कोड - ४०२ २०१**

ई-मेल पत्ता : alibag.ee@mahapwd.com    दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र. २१ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून (जे निविदेत असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करतील त्यांचे कडून)/नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब २ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १. | २०० बेडचे सामान्य रुग्णालय, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगडचे ३०० बेडमध्ये श्रेणीवर्धन करुन इमारतीचे बांधकाम करणे. | रु. ८४,८८,६५,५५४/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २०.०९.२०२४ (स.१०.०० ) ते दिनांक ०४.१०.२०२४ (सं.१८.००)
निविदापूर्व बैठक : मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दि. २४.०९.२०२४ रोजी दु. ३.०० वाजता
ई-निविदा उघडणे : दिनांक ०७.१०.२०२४ (दु. ३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूवनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/४८०४/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, अलिबाग - ४०२ २०१
दिनांक :- १३.०९.२०२४

**सही/-**
**(ज. ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता,
सा.बां. विभाग, अलिबाग,
जि.रायगड

# मुरुडमधील प्रकरणाचा सखोल तपास करणार

## जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची माहिती

## मुरूडमधील मोर्चा रद्द झाल्याने शिष्टमंडळाने घेतली भेट

**मुरूड : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी मुरूडच्या भोगेश्वर पाखाडीत दोन लहान मुलांनी गौरी गणपती विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक केल्याने शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या कथित प्रकरणाबाबत पोलीस खोलवर तपास करणार असून लोकांच्या शंका तपासून संबंधितांवर गुन्हे दाखल करणार. पोलीस एवढे सहकार्य करीत असताना जर कोणी कायदा मोडला तर त्याला मात्र गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिला आहे.



मुरूडमधील हिंदू समाजातर्फे मोठा मोर्चा काढण्यात येणार होता, पण जमावबंदी असल्याने तसेच मोर्चाला कोणतीही परवानगी नसल्याने मोजकेच लोक एकत्र येऊन त्यांनी आपले निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिले.

या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे म्हणाले की, मुरूड जंजिरा हे पर्यटनस्थळ असल्याने अशा भागात वाद होणे हे हितकारक नाही. याचा गंभीर परिणाम हॉटेल व लॉजिंग व्यावसायिकांना भोगावा लागणार आहे. त्यामुळे दोन्ही समाजांनी एकोपा ठेवणे खूप आवश्यक आहे. आजच्या सभेत उपस्थित केलेले सर्व मुद्दे तपासात घेण्यात येणार असून या प्रकरणाचा खोलवर तपास करून दोषींवर गुन्हे दाखल करणार आहोत.

या प्रकरणात जो कोणी मास्टरमाईंड आहे त्याचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. सोशल मीडियावर ज्या महिलेने तेढ निर्माण करणारे वक्तव्य केले त्या महिलेवर गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती या वेळी घार्गे यांनी दिली. नांदगाव येथील जमावाने संबंधित लोकांची घरावर दगडफेक व तोडफोड केल्यावर पोलिसांनी त्यांना तिथेच रोखल्याने पुढचा अनर्थ टळल्याचेही त्यांनी सांगितले.

# नेरळमधील वकील तरुणाचा डेंग्यूने मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील उच्चशिक्षित तरुणाचा बळी डेंग्यूने घेतला आहे. वकिलीची सनद याच वर्षी मिळविलेल्या मुस्तफा तथा राजू रफिक अत्तार असे त्या तरुणाचे नाव असून नेरळच्या बोंबील आळी येथे त्यांचे कुटुंब राहते.

रफिक अत्तार यांचा पुत्र मुत्सफा हा काही दिवस ताप आणि अंगदुखी आजाराने त्रस्त होते. त्यामुळे त्याला नेरळमधील खासगी रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल करण्यात आले, मात्र मुस्तफाच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने डॉक्टरांनी त्याची पांढ्या पेशींसंदर्भातील रक्त तपासणी करण्यास सांगितले. त्याप्रमाणे रक्त तपासणी केली असता रिपोर्ट नॉर्मल आले होते. त्यानंतर डेंग्यू आणि पेशींसंदर्भातील रक्त तपासणी केली असता डेंग्यूचे निदान समोर आल्याची माहिती समोर आली आहे, मात्र तेथे उपचार घेत असताना मुस्तफाच्या प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. अखेर १३ सप्टेंबरच्या दिवशी अचानक मुस्तफाची प्रकृती खालवल्याने त्याला नेरळ येथून बदलापूर येथे रुग्णवाहिकेतून नेले जात असताना रस्त्यातच त्याची प्राणजोत मालवली.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच नेरळ प्राथमिक आरोग्य विभागाने या तरुणाच्या घरातील व्यक्तींचे रक्ताचे नमुने घेतले असून त्या परिसरात आजारी व्यक्तींच्या रक्त तपासणी संदर्भातील १४ दिवसांचे सर्वेक्षण सुरू केले आहे.

**आम्ही घटना घडल्यावर तत्काळ नेरळच्या जुनी बाजारपेठमधील मशीदपासून सानेवाडापर्यंत दोन हजारहून अधिक लोकांच्या आरोग्य तपासण्या पूर्ण केल्या आहेत. त्यात कुठेही कोणताही रुग्ण डेंग्यूसदृश आजाराने बाधित नाही असे सिद्ध झाले आहे. त्यामुळे मृत तरुण हा मुंबई-नेरळ असा दररोज प्रवास करीत होता आणि त्यामुळे मुंबई येथे कामाच्या ठिकाणी त्याला डेंग्यूसदृश लागण झाली काय याचा शोध घ्यावा लागणार आहे.**
**-डॉ. नितीन गुरव, तालुका आरोग्य अधिकारी**

## अलिबागमध्ये विजेचा शॉक लागून कामगाराचा मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागच्या विद्यानगर येथे बांधकाम करणाऱ्या कामगाराचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला आहे. नरेश चंद्रा राजवंशी असे मृत कामगाराचे नाव असून तो मुळचा पश्चिम बंगालमधील नादीया जिल्ह्यातील शांतीपूर येथील रहिवासी आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत विद्यानगर येथे मुकबधीर शाळेचे काम सुरू आहे. शाळेच्या स्लॅबच्या सेंटरींगचे काम सुरू असताना नरेश राजवंशी या कामगाराला विजेचा जबर धक्का बसला. त्यामुळे बेशुद्ध अवस्थेत त्याला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता त्याचा मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात नोंद करण्यात आली असून हवालदार एम.एस. मगर या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

# भाजप नेते दिलीप भोईर यांचा दानशूरपणा

## न्हावे येथील सरर्लेकर परिवाराला अर्थसहाय्य

**धाटाव : प्रतिनिधी**

अलिबागमधील युवकांच्या गळ्यातील ताईत असलेले भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर तथा छोटमशेठ यांच्या माध्यमातून न्हावे, नवखार, सोनखार, महादेव खार आणि दिव येथील जवळपास ३०० ते ३५० कुटुंबीयांना अर्थसहाय्य स्वरूपात पाच लाख रुपये भावकीतील प्रमुखांकडे देण्यात आले.


सरर्लेकर कुटुंबीयांना भव्य दिव्य मंदिर बांधून देणार, असा शब्ददेखील भोईर यांनी दिला. या वेळी सरर्लेकर परिवारासोबत भाजपचे रोहा तालुका सरचिटणीस मिलिंद झुरे, अध्यक्ष सुनील सरर्लेकर, उपाध्यक्ष संकेत सरर्लेकर, सदस्य निकेश सरर्ले कर, मिलिंद सरर्लेकर, आदर्श सरर्लेकर, महेंद्र सरर्लेकर, सुशांत पाटील हे अलिबाग येथील छोटमशेठ यांच्या निवासस्थानी उपस्थित होते.



याचबरोबर छोटमशेठ यांनी न्हावे येथील आई एकवीरा मंदिरासाठी सुशांत मंगेश पाटील यांच्याकडे उत्तम दर्जाच्या खुर्च्यांसाठी रोख रक्कम १८ हजार रुपये दिले.

## गणेश विसर्जनामुळे द्रुतगती मार्गावर अवजड वाहनांना बंदी

**खालापूर :** अनंत चतुर्दशीला सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणपतींचे विसर्जन असल्याने मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाटातून पुणेहून मुंबईकडे जाणाऱ्या अवजड वाहतुकीला बंदी असल्याचे महामार्गा बोरघाट वाहतूक पोलीस मदत केंद्राचे उपनिरीक्षक अनिल शिंदे यांनी जाहीर केले आहे. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ६ ते १८ सप्टेंबर रोजी पुढील आदेश होईपर्यंत पुणेकडून मुंबई, नवी मुंबई, जेएनपीए, ठाणे-कल्याण-भिवंडी या मार्गाने जाणारी अवजड वाहने थांबविण्यात येणार आहेत.





**रोहा : खासदार सुनील तटकरे यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचा गणेशोत्सव ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकांत पार्टे व अमेय जोशी यांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान सन्मान केला. सोबत इतर मान्यवर व पदाधिकारी.** (छाया : महादेव सरसंबे)

# रेवदंडा अर्बन बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा अर्बन बँकेची ९५वी वार्षिक सर्वसाधारण नुकतीच झाली. या सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष प्रभाकर नाईक होते.

सभेस बँकेच्या उपाध्यक्ष धरती राउत, संचालक वामन घरत, नजमुस्साकिब लांबाते, जाकीर अली हमदुले, संचालक सतिश लेले, आरती मढवी, गजानन झेंडेकर, अंजनकुमार तांबडकर, संचालक अरुण म्हात्रे, महेंद्र पाटील, मंगेश परभाळे, निलेश गाडे, तज्ज्ञ संचालक शादाब महमद रफिक काठे, मुख्य कार्यकारी अधिकारी मोहम्मदअली हाजते, व्यवस्थापक दिनेश माळी, वसुली अधिकारी गिरीष चिटणीस, माजी संचालक जुलेखा तांडेल व कर्मचारीवर्ग तसेच हेमंत गणपत, सुराराम माळी, सुरेश कोटकर-घरत, महेंद्र घरत यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित सभासदांचे स्वागत आणि दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सुचनेचे तसेच सभेचे इतिवृत्तात वाचन वाचन वसूली अधिकारी गिरीष चिटणीस यांनी केले. दिनेश माळी लेखा परीक्षण अहवाल वाचन केले तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोहम्मदअली हाजाते यांनी सन २०२३-२०२४चा संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद, व नफातोटा पत्रक तसेच नफा वाटणीस मान्यता देणे आदी वाचन केले.

अहवालाची नोंद, अंदाजपत्रकास मंजुरी, एकरकमी कर्जफेड योजनेंतर्गत बंद झालेल्या कर्जखात्याची नोंद, पोटनियम दुरूस्तीस प्रस्तावास मंजुरी, वार्षिक सर्वसाधारण सभेत गैरहजर असलेल्या सभासदाना अनुपस्थिती क्षमापित करणे आणि अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी सभेपुढे आलेल्या विषयांचा विचारविनियम करण्यात आला.

संचालक अरुण म्हात्रे यांनी बँकेच्या वाटचालीची माहिती दिली. सभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली. संचालक सतिश लेले यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.



## चोरीसाठी दुकानाचे शटर तोडणारी निघाली अल्पवयीन मुले

### नेरळमधील घटना; मुख्य आरोपी फरार

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ बाजारपेठेत मशिदीच्या बाजूला असलेल्या दुकानात चोरी करण्यासाठी शटर तोडण्यात आले होते. या प्रकरणी तीन अल्पवयीन बालकांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून मुख्य आरोपी फरार आहे.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत ११ सप्टेंबरच्या मध्यरात्री १.२०च्या सुमारास बाजारपेठेतील मुजाहिद खोत यांचे किराणा दुकानाचे शटर उचकटून चोरी करण्याचा प्रयत्न झाला. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली होती आणि त्याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता.

घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पाहून चार आरोपी असल्याचे स्पष्ट झाल्यावर ते सर्व आरोपी अंबरनाथ आणि उल्हासनगर येथील राहणारे असल्याचे तांत्रिक तपासाद्वारे निष्पन्न केले. या आरोपींपैकी तीन आरोपींना ताब्यात घेतल्यावर ते तिन्ही आरोपी विधिसंघर्षग्रस्त बालके असल्याचे निष्पन्न झाले, तर एक मुख्य आरोपी मात्र फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहोत.

## अंतोरे येथे वर्षावास मालिकेचे अकरावे पुष्प



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुका भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून सुरू असणाऱ्या वर्षावास मालिकेचे अकरावे पुष्प अंतोरे येथील बुद्ध विहारात तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी प्रवचनकार तथा रायगड समाजभूषण पुरस्कार प्राप्त राजेंद्र बावस्कर यांनी वर्षावास मालिकेचे महत्त्व उपस्थिताना पटवून दिले.

या कार्यक्रमाला पेण तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनवणे, अंतोरे ग्रामपंचायत माजी उपसरपंच राजेश कांबळे, रोडे गाव पोलीस पाटील सुरेश सोनवणे, सचिव नरेश गायकवाड, मंगेश कांबळे, ज्येष्ठ कार्यकर्ते भास्कर कांबळे, सुनील खरात, सुनील शिंदे, संजय गायकवाड, प्रवीण गमरे, यश कांबळे, नैतिक कांबळे, महिला कार्यकर्त्या मानसी कांबळे आदी उपस्थित होते.

या वेळी प्रवचनकार राजेंद्र बावस्कर यांनी तथागत भगवान गौतम बुद्धांनी जगाला दिलेल्या विज्ञानावर आधारित बुद्ध धम्माचा अभ्यास आणि त्याचा प्रचार व प्रसार याची माहिती दिली. त्यांचा व तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनवणे यांचा कांबळे कुटुंबाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

# लोधिवली ग्रामपंचायतीकडून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल वितरण



**चौक : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजनेचा शुभारंभ झालेला आहे. लोधिवली ग्रुप ग्रामपंचायतीकडून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पूर्णत्वास आणि मंजुरी मिळाली त्यांना ई-प्रणाली माध्यमातुन घरकुलांचे वाटप करण्यात आले.

घर नसलेल्या किंवा गरीब परिस्थितीत राहणाऱ्या कुटुंबांना मदत करण्यासाठी सरकारने सन २०१६मध्ये नियम व अटीनुसार पंतप्रधान आवास योजना सुरू केली आहे. ग्रामीण भागातील या कुटुंबांसाठी मूलभूत गरजा असलेली घरे बांधण्याचे उद्दिष्ट नक्की करण्यात आले आहे. या अंतर्गत दोन कोटी घरे बांधली गेली आहेत, जे २.७२ कोटी घरांच्या ठरलेल्या उद्दिष्टाच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. घरे विशिष्ट आकाराची, स्वच्छ स्वयंपाक, शौचालय आणि खेळत्या वातावरणातील क्षेत्र असणे आवश्यक आहे. कुटुंबांची निवड करताना अटी, शर्ती यांचे पालन केले जाते. स्थानिक ग्रामसभांद्वारे त्यांची पडताळणी करून मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवण्यात येतो. लाभधारकांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा होतात. या योजनेची गरज लक्षात घेऊन केंद्र सरकारने तिला आणखी दोन वर्षांसाठी मुदत दिली आहे.

ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली येथे ग्रामीण टप्पा २ व अंतर्गत घरकुलांना मंजुरी मिळाली, त्यांना पहिला हप्ता वितरण करण्यात आला, तर पूर्ण झालेल्या घरकुलाची ई-चावी देण्याचा घरकुलांच्या ई-गृहप्रवेश कार्यक्रम ग्रामपंचायत सदस्यांच्या उपस्थितीत झाला. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सन २०२३-२४ व २०२४-२५मधील पूर्ण घरकुल लाभार्थींना ई-गृहप्रवेश चावी प्रशस्तीपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य सुभाष शिंदे, सुशीला भुईकोट, भारती चाळके, मंगल वाघमारे, निखिल पाटील, ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब गोल्हार, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी लाभार्थी विष्णू पवार, मारुती पवार, मंगल मोरे, विमल वाघमारे यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले.

# गणेश दर्शन

























पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांनी सार्वजनिक तसेच घरोघरी विराजमान झालेल्या गणपती बाप्पाचे मनोभावे दर्शन घेतले. त्यांनी पनवेल, नवीन पनवेल, विहिघर, चिपळे, बोनशेत, कोप्रोली, आदई, भोकरपाडा, कळंबोली येथे दौरा केला. या वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, तुकाराम सरक, भाजप कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, अमर पाटील, बबन मुकादम, राजू शर्मा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, संदीप म्हात्रे, युवा मोर्चा सरचिटणीस विश्वजीत पाटील, कोप्रोली माजी सरपंच रमेश पाटील, किशोर चौतमोल, सुमित पाटील व इतर मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते.








पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कान्हाशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर कुटुंबियांच्या न्हावेखाडी येथील गणरायाचे व श्री सत्यनारायण महापुजेचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर तसेच सम्राट ठाकूर, रोशन ठाकूर, दर्शन ठाकूर, स्वप्नील ठाकूर आदी उपस्थित होते.













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com